**नागरी स्थानिक संस्थांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबींच्या दाव्यांचा निपटारा करण्याकरीता तक्रार निवारण समितीचे पुनर्गठन करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१५७/नवि-२०**
**मत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक :-०७ एप्रिल, २०२६.**

**वाचा :-**

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ७०३८/२०१३ (रत्नागिरी जिल्हा न्यायालयीन कर्मचारी (वर्ग-३) संघटना, रत्नागिरी विरूध्द महाराष्ट्र शासन) या न्यायालयीन प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने दिनांक १५ ऑक्टोबर,२०१६ रोजी दिलेले आदेश.
२. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. एचसीपी २०१६/प्र.क्र.१६४/का.६, दिनांक १२ एप्रिल, २०१७.
३. शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१५७/नवि-२०, दिनाक २७ जून, २०१७.
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. कार्याशा-२०२५/प्र.क्र.०६/म-८, दिनांक ०९ एप्रिल, २०२५.

**प्रस्तावना :**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक ७०३८/२०१३ (रत्नागिरी जिल्हा न्यायालयीन कर्मचारी (वर्ग-३) संघटना, रत्यागिरी विरूध्द महाराष्ट्र शासन) या न्यायालयीन प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने १५.१०.२०१६ रोजी दिलेल्या आदेशातील निर्देशानुसार नगरपालिका, महानगरपालिका येथील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबीबाबत्तव्या दाव्यांचा जलद निपटारा करण्याच्या दृष्टीकोनातून संदर्भ क्र.३ वरील शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त स्तरावर तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे.

महसूल प्रशासनाच्या अध्यक्षतेखालील गठीत विविध समित्यांचा आढावा घेऊन व एकाच उद्दीष्टासाठी कार्यरत असलेल्या, बहुसंख्य सदस्य समान असलेल्या व सदस्य सचिव समान असलेल्या समित्यांचे एकत्रिकरण करणे, समिती रचनेमध्ये बदल करणे याबाबत अभ्यास गटाद्वारे शिफारस करण्यात आली आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त यांचेकडे असलेल्या प्रशासकीय कामाचा व्याप लक्षात घेता सदर समितीचे पुनर्गठन करुन अध्यक्ष म्हणून अपर विभागीय आयुक्त यांची तसेच, सदस्य सचिव म्हणून संबंधित उपायुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबींच्या दाव्यांचा निपटारा करण्याकरीता असलेल्या तक्रार निवारण समितीचे पुनर्गठन करण्यात येत आहे. त्यानुसार, सदर तक्रार निवारण समितीची संरचना खालील प्रमाणे करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | संबंधित अधिकारी | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १) | **संबंधित अपर विभागीय आयुक्त (महसूल)** | **अध्यक्ष** |
| २) | **संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयातील प्रादेशिक उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन** | **सदस्य** |
| ३) | **संबंधित उप आयुक्त, महानगरपालिका / मुख्याधिकारी, नगरपरिषद** | **सदस्य सचिव** |

०२.    सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४०७१८५७२६९०२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीत साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANILKUMAR R UGLE

Digitally signed by ANILKUMAR R UGLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Urban Development Department, 2.5.4.20=1D265DC74C98F72F41F5A1403DB16525E09E7DE2E336C366DE3A32EA2A050A8A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8BBD8635D43D23F28021156F38051619258C51238668F40D15D3209EA39554AA, cn=ANILKUMAR R UGLE
Date: 2026.04.07 18:58:13 +05'30'

(अनिलकुमार रा. उगले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव.
४) मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव.
५) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६) मा. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
७) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव
८) सर्व सन्मानीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य.
९) मा. लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय.
१०) मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक.
११) मा. राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय.
१२) अप्पर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-१), मंत्रालय, मुवई.
१३) अप्पर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय. मुंबई.
१४) प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुवंई.
१५) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई.
१६) सर्व विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी.
१७) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
१८) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व).
१९) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंवई यांना विनंती करण्यात येते की, सदरचा शासन निर्णय विभागाच्या नागरीकांची सनदवर प्रसिध्द करण्यात यावा.
२०) निवडनस्ती (नवि-२०).